**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी, ४११ ०१८**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## जाहिरात क्र.१८४/२०२२चे अनुषंगाने जाहीर निवेदन
## ऑनलाईन परिक्षा शुल्काबाबत..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील गट ब व क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी दि.१४/०८/२०२२ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात क्र.१८४/२०२२ प्रसिध्द करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानुसार ऑनलाईन अर्ज सादर करणेचा शेवटचा दिनांक ०८/०९/२०२२ निश्चित करण्यात आला होता. जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व पूर्ततेसह उमेदवारांना ऑनलाईन अर्ज सादर करण्यास दिनांक १९/०९/२०२२ (सांयकाळी ६.०० पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली होती.

सदरचे जाहीर निवेदनाद्वारे सर्व उमेदवारांना कळविण्यात येत आहे की, जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व पूर्ततेसह दिनांक १९/०९/२०२२ (सांयकाळी ६.०० पर्यंत) उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आलेली अर्ज सादर करण्याची ऑनलाईन लिंक बंद करण्यात येत आहे. तथापि ज्या उमेदवारांनी दिनांक १९/०९/२०२२ रोजी सांयकाळी ६.०० पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करणेकामी रजिस्टेशन केले आहे,परंतू त्यांनी परिक्षा शुल्क अदा केले नाही.किंवा तांत्रीक अडचणींमुळे परिक्षा शुल्क अदा झालेले नाही. त्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा शुल्क अदा करणेकामी दिनांक २६/०९/२०२२(सांयकाळी ६.०० पर्यंत) मुदत देण्यात येत आहे. दिलेल्या मुदतीत ऑनलाईन परिक्षा शुल्क अदा करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी. दिलेल्या मुदतीत परिक्षा शुल्क अदा करणेकामी आणखी मुदत अनुज्ञेय राहणार नाही, त्याप्रमाणे उमेदवारांनी नोंद घेऊन विहीत मुदतीत परिक्षा शुल्क अदा करावेत.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - प्रशा/१/कावि/५०७ /२०२२
दिनांक १९ /०९/२०२२